# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:19.02.2026** **वार:गुरुवार**

1. एआय इंडिया इम्पॅक्ट शिखर परिषदेचं आज पंतप्रधानांच्या हस्ते उद्घाटन, परिषदेच्या अनुषंगानं विविध देशांच्या राष्ट्रप्रमुखांशी चर्चा
2. प्लास्टीक बाटल्यांच्या पुनरवापरासाठी करार
3. राज्यसभेच्या 37 जागांसाठी द्वैवार्षिक निवडणूक जाहीर, महाराष्ट्रातल्या 7 जागांचा समावेश आणि
4. टी ट्वेंटी विश्वचषक स्पर्धेत भारताचा नेदरलँडस्वर 17 धावांनी विजय

**<u>एआय इंडिया इम्पॅक्ट</u>**

भारत एआय शिखर परिषदेचं उद्घाटन आज नवी दिल्लीतील भारतमंडपम इथं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे. सर्वजन हिताय सर्वजन सुखाय ही भारतात होणाऱ्या एआय शिखर परिषदेची संकल्पना आहे. उद्घाटनाच्या सत्रात फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉँ, संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस अँटोनिओ गुटेरस यांच्यासह जगभरातल्या विविध उद्योग प्रमुखांचं भाषण होणार आहे. याशिखर परिषदेत कृत्रिम बुद्धीमत्ता क्षेत्रातले जागतिक अग्रणी, उद्योगांचे संस्थापक, प्रमुख कार्यकारी अधिकारी, प्रमुख तंत्रज्ञान अधिकारी तसंच विचारवंत यांच्यासह मंत्री आणि वरीष्ठ सरकारी अधिकारी सहभागी होणार आहेत. या परिषदेतील कालच्या घडामोडींचा हा वृत्तांत...

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल नवी दिल्लीत होत असलेल्या एआय इंडिया इम्पॅक्ट शिखर परिषदेसाठी आलेल्या विविध जागतिक नेत्यांशी संवाद साधला आणि द्विपक्षीय बैठक घेतल्या. या बैठकांमध्ये द्विपक्षीय संबंध, भविष्यातील जागतिक आव्हानं, तंत्रज्ञानातील सहकार्य आणि जागतिक पटलावर भारताची भूमिका याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. पंतप्रधान तंत्रज्ञान क्षेत्रातील प्रमुख नेत्यांनाही भेटले.**

**AI इंडिया इम्पॅक्ट प्रदर्शनाला भरघोस प्रतिसाद मिळाल्यानंतर केंद्र सरकारनं या प्रदर्शनाला एका दिवसाची मुदतवाढ दिली आहे. आता हे प्रदर्शन 21 तारखेपर्यंत खुलं असेल. या परिषदेमध्ये 24 तासांत अडीच लाखाहून अधिक विद्यार्थ्यांनी जबाबदार एआयची प्रतिज्ञा घेऊन गिनीज विश्व विक्रम प्रस्थापित केला.**

उद्योगांमध्ये उत्पादकता वाढीसाठी तसंच आरोग्यसेवा, शेती आणि हवामान बदल यासारख्या लोकसंख्येच्या आव्हानांना तोंड देण्यासाठी एआयचा वापर करण्यास देश प्राधान्य देत आहे असं केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितलं. AI इंडिया इम्पॅक्ट परिषदेमधील संशोधन परिसंवादाच्या उद्घाटन समारंभात बोलत होते. सुरक्षित AI साठी तरुणांनी सूचना कराव्यात असं आवाहन त्यांनी केलं. देशातील युवा पिढीमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाबाबत दिसणाऱ्या उत्साहाचं त्यांनी कौतुक केलं. ते म्हणाले...

**एआई का उसी माध्यम से उसी विजन के साथ किस तरह से पॉपुलेशन स्केल पे प्रॉब्लम्स को सॉल्व कर पाए वो फोकस है इस एआई समिट में आप देख रहे हैं कितनी ऊर्जा है कितनी एनर्जी है किस तरीके से देश के दुनिया के सभी एआई के लीडर्स यहाँ पर उपस्थित है और विशेषकर युवाओं में नौजवानों में बहुत उत्साह है की**

**इस नई टेक्नोलॉजी का उपयोग करके नए सॉल्यूशंस लाए और एक नए तरीके से देश की दुनिया की प्रॉब्लम्स को सॉल्व करे।**

**FedEx**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर जागतिक लॉजिस्टिक्स कंपनी FedEx च्या हबचं भूमिपूजन करण्यात आलं. जागतिक व्यापारातील बदलत्या पुरवठा साखळीच्या पार्श्वभूमीवर फेडेक्ससारख्या कंपनीनं मुंबईत गुंतवणूक करणं हे राज्याच्या वाढत्या सामर्थ्याचं प्रतीक असल्याचं फडणवीस यांनी नमूद केलं.

**हवामान सप्ताह 2026**

हवामान बदलाचा सामना आणि चक्रीय अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी, मुंबई हवामान सप्ताह 2026 दरम्यान दोन महत्त्वाच्या सामंजस्य करारांवर स्वाक्षरी करण्यात आली. पीईटी बाटल्यांचं संकलन आणि पुनर्वापरासाठी देशात पहिल्यांदाच एखाद्या कंपनीनं राज्याबरोबर असा करार केला आहे. या उपक्रमामुळे राज्यभर प्लास्टिक कचऱ्याचं व्यवस्थापन सुधारण्याची आणि शाश्वत विकासाला गती मिळण्याची अपेक्षा आहे.

**राज्यसभा निवडणूक**

भारतीय निवडणूक आयोगानं राज्यसभेच्या रिक्त होणाऱ्या 37 जागांसाठी द्विवार्षिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला असून, यामध्ये महाराष्ट्रातील 7 जागांचा समावेश आहे. या रिक्त होणाऱ्या जागांसाठी 16 मार्चला मतदान होणार आहे. 26 फेब्रुवारीला निवडणुकीची अधिसूचना जारी केली जाईल, उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची तारीख 5 मार्च असेल.

**हिंदवी स्वराज्य महोत्सव**

छत्रपती शिवाजी महाराज यांची 396 वी जयंती आज साजरी होत आहे. त्यानिमित्ताने राज्यभरात विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांची जन्मभूमी असलेल्या जुन्नर तालुक्यातल्या किल्ले शिवनेरीच्या पायथ्याशी, 'श्री छत्रपती शिवाजी महाराज जन्मोत्सव: हिंदवी स्वराज्य महोत्सव 2026' या कार्यक्रमाचं आज आयोजन करण्यात आलं आहे. पुणे जिल्हा प्रशासन आणि पर्यटन विभाग यांनी संयुक्तपणे या महोत्सवाचं आयोजन केलं आहे. छत्रपती शिवरायांच्या जाज्वल्य इतिहासाला उजाळा देणारे, सांस्कृतिक, क्रीडा आणि लोककलेचे विविध उपक्रम या महोत्सवाच्या माध्यमातून राबविण्यात येणार आहेत.

**कातळशिल्प**

कोकण किनारपट्टी आणि पठारावर आढळणाऱ्या हजारांपेक्षा जास्त प्राचीन कातळशिल्पांचं सखोल संशोधन, दस्तऐवजीकरण आणि त्यांच्या संरक्षणासाठी वर्ल्ड हेरिटेज डेस्कची स्थापन करण्यात आल्याची माहिती राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री आशीष शेलार यांनी दिली आहे. यासाठी राज्य शासनाने 14 कोटी 62 लाखांहून अधिक खर्चाला मान्यता दिली आहे. प्रकल्पाच्या अंमलबजावणीची जबाबदारी पुरातत्व आणि वस्तुसंग्रहालये संचालनालय, मुंबई यांच्याकडे असेल, असं शेलार यांनी सांगितलं.

**भीमनवार**

राज्य लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षपदावर विवेक भीमनवार यांची नियुक्ती झाली आहे. राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी काल भीमनवार यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली.

**पालघर प्रदर्शन**

पालघर मध्ये सेंट जॉन कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग आणि इस्त्रो यांच्या संयुक्त विद्यमान विक्रम साराभाई स्पेस प्रदर्शनाचं आयोजन करण्यात आलं आहे. स्पेस ऑन व्हील्स हा चलत-प्रदर्शन उपक्रम या प्रदर्शनाचं मुख्य आकर्षण ठरलं आहे. विद्यार्थ्यांमध्ये आणि सर्वसामान्यांमध्ये अंतराळ विज्ञान आणि तंत्रज्ञाना विषयी जागरूकता निर्माण करणे, विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन विकसित करणे, विद्यार्थ्यांना विज्ञान, अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान क्षेत्रात करिअर करण्यासाठी प्रेरित करणे हा या प्रदर्शनाचा मुख्य उद्देश आहे.

**महिला आयोग**

चंद्रपूरमध्ये 'महिला आयोग आपल्या दारी' या उपक्रमांतर्गत राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आलेल्या जनसुनावणीमध्ये महिलांच्या 95 तक्रारींवर कार्यवाही करण्यात आली. महिलांना आपल्या समस्यांबाबत मुंबईत चकरा माराव्या लागू नये, स्थानिक स्तरावरच त्यांच्या तक्रारींची सोडवणूक व्हावी, या उद्देशाने महिला आयोगच तुमच्या दारी आला आहे असं चाकणकर यांनी यावेळी सांगितलं.

**मराठी शाळा**

राज्य सरकारच्या मराठी शाळा कमी करण्याच्या निर्णया विरोधात, पालक आणि विद्यार्थ्यांनी काल भंडाऱ्यात जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा नेला होता. राज्य सरकारने योग्य तो निर्णय घ्यावा, हिंदी भाषा महाराष्ट्रवर लादू नये, जाधव समिती रद्द करावी अश्या अनेक मागण्या यावेळी करण्यात आल्या. राज्य सरकारनं 18 हजार मराठी शाळा कमी करण्याचा निर्णय घेतला असून भंडारा जिल्ह्यातील 155 शाळा ह्या आदिवासी दुर्गम भागातील शाळा आहेत.

**क्रिकेट**

पुरुषांच्या वीस षटकांच्या आयसीसी विश्वकरंडक स्पर्धेत काल भारतीय संघानं नेदरलँडसच्या संघावर 17 धावांनी विजय मिळवला. अहमदाबाद इथं झालेल्या सामन्यात भारतानं प्रथम फलंदाजी करताना 20 षटकांत 193 धावा केल्या. त्याला उत्तर देताना नेदरलँडसच्या संघाला 20 षटकांत 176 धावा करता आल्या. वरुण चक्रवर्तीनं 3 तर शिवम दुबेनं दोन फलंदाजांना बाद केलं. 31 चेंडूत 66 धावा करणाऱ्या अष्टपैलू शिवम दुबेला सामनावीर घोषित करण्यात आलं.

**हवामान**

राज्यात सर्वत्र आज हवामान कोरडं राहण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरच प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.